# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


<u>दिनांक २७/०१/२०२५ (सोमवार) दुपार</u>

---

## अवैध घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पोस्टे कळमेश्वरः—** दिनांक २६/०१/२०२५ रोजी पोस्टे कळमेश्वर येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता गोपनीय माहिती मिळाली की, **आरोपी नामे— नवनीत उर्फ कमलेश कन्हैया धुर्वे वय २४ वर्ष रा. वार्ड क्र १५ गजानन मंदिर मागे नितीश नागपुरे यांच्या घरी किरायाने, कळमेश्वर ता. कळमेश्वर जि. नागपुर** याने आपले राहते घरी लोखंडी तलवारसारखे बेकायदेशीर हत्यार लपवुन ठेवले आहे. अशा माहिती वरून कळमेश्वर स्टाफ यांनी आरोपीचे राहते घराची घरझडती घेतली असता, आरोपीच्या घराच्या पहील्या खोलीतील लाकडी दिवानखाली एक जुनी लोखंडी पात्याची तलवार जिची लांबी ३२.५ इंच, लोखंडी पात्याची लांबी २५ इंच, पात्यापासुन मुठेची लांबी ७.५ इंच, किंमती अंदाजे २०० रुपये अशी मिळुन आल्याने ताब्यात घेवून जप्त करण्यात आली. आरोपी विरुध्द पोस्टे कळमेश्वर येथे कलम ४, २५ शस्त्र अधिनियम १९५९ अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

## पो.स्टे. सावनेर हद्दीमधील जुगार अड्डयावर धाड

## —: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक २६/०१/२०२५ रोजी पोस्टे सावनेर येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, पोस्टे सावनेर हद्दीत वार्ड क्र. ५ पाटणसावंगी, सावनेर येथे काही लोक ५२ ताशपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत आहे. अशा खात्रीशीर माहिती वरून पोस्टे सावनेर हद्दीत वार्ड क्र. ५ पाटणसावंगी, सावनेर येथे जुगार अड्डयावर रेड केली असता यातील **आरोपी नामे— १) अशोक श्रीकिशन गाडे २) अतुल हरीश ठाकरे ३) वसंत सिंग हरीसिंग जनवार ४) शरद चंदुजी बोकरे ५) स्वप्नील पंढरी साबळे सर्व रा. पाटणसावंगी सावनेर** हे हारजितचा जुगार खेळ खेळतांनी मिळुन आल्याने आरोपीतांकडुन ५२ तास पत्यावर पैशाची बाजी लावून हारजितचा जुगार खेळतांना मिळून आल्याने त्यांचाकडून नगदी ९९८०/— रूपये व ५२ ताश पत्त किंमती —४०/—रू असा एकुण १००२०/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपीतांविरूद्ध पोस्टे सावनेर येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम १८८७ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर